# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

**ANNUAL EXAMINATION 2024-25**

**MARATHI**

Class : VII — Duration : **3** Hrs
Date : 21.03.2025 — Max. Marks : **80**
Admission No.: — Roll No.:

---

**सूचना:**

- सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहिणे.
- खंड – क ,ख, ग, घ नमूद करावेत.
- स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

**[ खंड क वाचन कौशल्य ]**

**प्र 1 अपठित गदयांश –** (5)

शहरातील एका नावाजलेल्या शाळेत मोहन नावाचा हुशार मुलगा शिकत होता. त्याचे आई–वडील दोघेही डॉक्टर होते. त्यामुळे पैशाची कमतरता नव्हती मोहनला त्याच्या श्रीमंतीचा खूप गर्व होता . तो कोणाचीही मदत करत नव्हता एक दिवस बाई एका नवीन विदयार्थ्याला वर्गात घेऊन आल्या त्याचे नाव सुनील होते.नुकतीच सुनीलच्या वडिलांची बदली त्या शहरात झाली होती. बाईंनी मोहनला सुनीलची मदत करायला सांगितले व त्या निघून गेल्या. मात्र वर्गात मोहनने सुनीलची मदत केली नाही.त्याच्या इतर वर्गमित्रांनी त्याची मदत केली. तो सर्वांचा आवडता विदयार्थी झाला

**(क)** मुलाचे नाव काय होते ?

**अ** रोहन **ब** मोहन **क** सोहन

**(ख)** नवीन विदयार्थ्याला वर्गात कोण घेऊन आले ?

**अ** शिक्षक **ब** आई **क** बाई

**(ग)** नवीन विदयार्थ्याचे नाव काय होते ?

**अ** सुनील **ब** नील **क** संजय

**(घ)** मोहनचे आई–वडील कोण होते ?

**अ** वकील **ब** डॉक्टर **क** शिक्षक

**(ड.)** मोहनला कशाचा गर्व होता ?

**अ** घराचा **ब** गाडीचा **क** श्रीमंतीचा

**प्र 2 अपठित गदयांश –** (5)

एकदा एक म्हातारा शेतकरी शेतात काम करत होता. तो आंब्याची झाडे लावत होता. त्या देशाचा राजा भ्रमण करण्यासाठी तेथूनच जात होता. त्यांने शेतक–याला उन्हांत काम करताना पाहिले. राजा त्याच्याजवळ आला व म्हणाला ,काय करत आहात भर दुपारी ? शेतकरी म्हणाला मी आंब्याची रोपे लावत आहे. ते एकून राजाला नवल वाटले राजा म्हणाला शेतकरी बुबा, पण या आंब्याची फळे तुम्हाला खायला मिळणार नाही.फळे खूप वर्षांनी येतात ? त्यावर म्हातारा शेतकरी म्हणाला ,अरे बाबा रे! मी ज्या झाडाची फळे खातो ती मी लावलेली नाहीत. ती माइया आजोबाने

लावली होती. या झाडाची फळे माझे नातवंड खातील .राजाला हे ऐकून खूप आनंद झाला. त्याने शेतक–याला सोन्याच्या मोहरा बक्षीस म्हणून दिल्या.

प्रश्न –

1 शेतकरी कोठे काम करत होता ?

**अ** घरात **ब** गावात **क** शेतात

2 राजा कशासाठी जात होता ?

**अ** शिकारीसाठी **ब** भ्रमणासाठी **क** खेळण्यासाठी

3 शेतकरी कशाची रोपे लावत होता ?

**अ** आंब्याची **ब** फणसाची **क** केळीची

4 शेतकरी खात असलेल्या फळांची झाडे कोणी लावली होती ?

**अ** मामाने **ब** काकाने **क** आजोबाने

5 राजाने शेतक–याला काय बक्षीस म्हणून दिले ?

**अ** फळे **ब** पैसे **क** सोन्याच्या मोहरा

## खंड ख व्याकरण

**प्र 3 विरुधार्थी शब्द –** ( opposites ) (2)

**1** कृपा x ————————

**अ** अवाकपा **ब** अवकृपा **क** बेंकृपा

**2** अदब x ————————

**अ** मान **ब** बेआदब **क** बेआदाब

**प्र 4 लिंग बदला –** ( change the gender ) (2)

**1** सिंह =

**अ** सिंहणी **ब** सीहणी **क** सिहनी

**2** बैल =

**अ** बकरी **ब** घोडा **क** गाय

**प्रश्न 5 वचन बदला –** (write the plural noun ) (2)

**1** वाट = ————————

**अ** वाटो **ब** वाटा **क** रास्ते

**2** धान्य = ————————

**अ** बाजरी **ब** मका **क** धान्य

**प्र 6 समानार्थी शब्द लिहा–** (2)

**1** गाव = ————————

**अ** खेडे **ब** शहर **क** नगर

**2** अंग = ————————

**अ** हात–पाय **ब** शरीर **क** डोके

**प्र 7 काळ ओळखा –** **(2)**

**1** राधा गाणे गात होती.

**2** मला उदया तुझे पुस्तक देशील.

**प्र 8 खाली प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2)**

**1** पुस्तका + खाली = --------

**2** झाडा + खाली = --------

**प्र 9 खालील वाक्यातील क्रियापद ओळखा –** **(2)**

**1** राम कौतुक करीत म्हणाला.

**2** ती आज रडत होती.

**प्र 10 खालील वक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2)**

**1** आम्ही उदया नगरला जाणार .

**2** तुम्ही आमच्या घरी केव्हा येणार.

## खंड ग साहित्य

**प्र 11 पठित गदयांश –** **(5)**

प्रत्येक माणसाला कोणता ना कोणता छंद असतो. व्यक्ती तितक्या प्रकृती या नात्याने कोणाला संगीत आवडते कोणाला पुस्तके वाचायला आवडते तर कोणाला खेळ खेळायला आवडते. सचिन तेंडुरकर याने देखील आपल्या जीवनातील आवडता छंद निवडला, तो म्हणजे क्रिकेट. राजापूरच्या मराठी कुटुंबात सचिनचा जन्म 24 एप्रिल 1973 रोजी मुंबईत झाला सचिनच्या कुटुंबियांचे आवडते संगीत दिग्दर्शक सचिनदेंव बर्मन यांच्या नावावरून त्याचे नाव सचिन असे ठेवण्यात आले लहानपणापासून सचिनला क्रिकेट खेळण्याची फार आवड होती.

प्रश्न

**1** वरील उतारा कोणत्या पाठातून घेतला आहे?

**2** कोणता ना कोणता छंद कोणाला असतो?

**3** सचिनचा जन्म कोणत्या कुटुंबात झाला?

**4** सचिनचा जन्म केव्हा झाला ?

**5** सचीनच्या कुटुंबियांचे आवडते संगीत दिग्दर्शक कोण होते?

**प्र 12 पठित पदयांश –** **(5)**

वाट पाहत बसू कधी तिची, सारे आम्ही भाऊ
मोळी नसे विके तेव्हा, भुकेलेले झोपी जाऊ
एकदा काय झाले कसे, आम्हा काही कळले नाही
माय आली पाय बांधून भळाभळा रक्त वाही
चावला साप मोठा काळा दोन बाया होत्या सांगत
फणा काढून मारला त्याने हळूच गेला निघून रांगत

प्रश्न

**1** वरील ओळी कोणत्या कवितेतील आहेत?

**2** वाट पाहत कोण बसत ?

**3** कोण पाय बांधून आली?

**4** रक्त कसे वाहत होते?

**5** साप कसा होता ?

**प्र 13 जोडया लावा –** **(4)**

1 ज्ञान – क्षेत्रे

2 गुरु – भूती

3 तीर्थ – वंत

4 सहानु – देव

**प्र 14 रिकाम्या जागा भरा –** **(4)**

1 शिष्याने भरपूर ––– कमावले.

2 सचिनच्या नावावर बरेच विक्रम ––––गेलेले आहेत .

3 प्रशिक्षक ––– एक रुपयांच नाणं ठेवत असत.

4 नागपूर शहराची स्थापना ––– राजाने केली.

**प्रश्न 15 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2)**

1 मी खूप ज्ञान मिळविले?

2 तू खूप काळ माझी सेवा केली आहेस.

**प्रश्न 16 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – ( कोणतेही सात )** **(7x2=14)**

1 शेवटी गुरुदेव शिष्याला काय म्हणाले?

2 महाराष्ट्राची उपराजधानी कोणती?

3 नागपूर कोणत्या नावाने प्रसिध्द आहे?

4 तव्याची भाकरी कोणी आणली?

5 अहिल्यादेवीच्या हातात काय आहे ?

6 भाकरीच्या वासाने कवी का रडत असे?

7 विठ्ठलाने गळयात कशाची माळ घातली आहे ?

8 सचिनचा महत्त्वाचा गुण कोणता?

9 वडिलांनी श्यामचे कौतुक का केले ?

**प्रश्न 17 आपल्या मनपसंद चॉकलेटसाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(5)**

1 वृक्ष आपले मित्र

2 माझा आवडता खेळ

3 माझा मित्र

**प्र 19 स्वपरिचय लिहा :–** ( my self in marathi ) **(5)**

**प्र 20** आपली खुशाली कळविणारे पत्र मामास लिहा – **(5)**

**किंवा**

आपल्या वाढदिवसाचे निमंत्रण देणारे पत्र मित्रास लिहा –

**––––––– समाप्त –––––––**